# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०१७
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

| | | |
|---|---|---|
| (१) **महसूल मंत्री** | : | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा त्रेपन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| (२) **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** | : | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| (३) **जलसंपदा मंत्री** | : | महाराष्ट्र कृष्ण खोरे विकास महामंडळ, पुणे यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक लेखे व त्यावरील महालेखापाल (लेखापरीक्षा-१) महाराष्ट्र यांचा अलग लेखापरीक्षण अहवाल व अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |

**तीन : लोकलेखा समितीचा तेविसावा अहवाल सभागृहास सादर करणे.**

**चार : अशासकीय सदस्यांची विधेयके व ठराव याबाबत समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.**

**पाच : स्थगन प्रस्तावाच्या सूचना – (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**सहा : औचित्याचे मुद्दे.**

**सात : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १)**

(१) **सर्वश्री. जितेंद्र आव्हाड, अजित पवार, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, शशिकांत शिंदे, संदीप नाईक, भास्कर जाधव, राणाजगजीतसिंह पाटील, नरहरी झिरवाळ, पांडुरंग बरोरा, वैभव पिचड, सुरेश लाड, किसन कथोरे, कालीदास कोळंबकर, अमीन पटेल, अस्लम शेख, मो. आरिफ नसीम खान, प्रा.वर्षा गायकवाड, श्री अबु आझमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईला जोडणा-या पूर्व द्रुतगती महामार्गावरील ठाणे व मुलुंड दरम्यान रेल्वे रुळावर उभारण्यात आलेल्या पुलाच्या स्लॅबचे सिमेंट निखळलेले असून सदरचा पूल धोकादायक स्थितीत असल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये निदर्शनास येणे, मुंबई आणि ठाणे शहरासह राज्यातील इतर भाग आणि गुजरात, मध्यप्रदेश व इतर परराज्यांना जोडणारा कोपरी पुल अत्यंत महत्वाचा असून वाहनसंख्येचा विचार केल्यास या परिसरात वाहतुकीची निर्माण झालेली गंभीर समस्या, मुंबईहून येणारा व जाणारा पूर्व द्रुतगती महामार्ग ८ पदरी असतांना कोपरी पुल मात्र चारच पदरी असणे, या पुलावरुन दररोज किमान एक लाख वाहने ये-जा करत असुन पुलाच्या खालून लाखो प्रवाशांना घेऊन रेल्वे लोकलची वाहतुक सुरु असणे, महाड येथील सावित्री नदीवरील पुल कोसळून झालेल्या अपघाताचा विचार करता कोपरी येथील पुल रेल्वे रुळावर कोसळल्यास गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असतांना प्रशासनाचे त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, सदर पुलाचे रुंदीकरण व पुनर्बांधणी तातडीने करण्याबाबत लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांनी शासनाकडे केलेल्या मागण्या, शासनाचे त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी लाखो वाहनचालकांबरोबरच नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, सदर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री.भाऊसाहेब कांबळे, ॲड त्र्यंबक भिसे, सर्वश्री. अमित देशमुख, विनायकराव जाधव-पाटील, बसवराज पाटील, राधाकृष्ण विखे-पाटील, ज्ञानराज चौगुले, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"लातुर जिल्हयात माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे, मांजरा, रेणा, तेरणा, आदि नदयांना तसेच ओढे नाल्यांना आलेल्या पुरामुळे शेतीचे व सार्वजनिक मालमत्तचे झालेले नुकसान, श्रीरामपूर (ता.राहुरी,जि.अहमदनगर) येथील

शेतकऱ्यांनी सन २०१६ च्या खरीप हंगामातील पिक विमा हप्ता भरलेला असतांना अतिवृष्टीमुळे व इतर कारणांमुळे नुकसान झालेल्या पिकांचे कृषी व महसुल विभागामार्फत पंचनामे करुन नियमानुसार ४० दिवसांत शेतक-यांना प्रधानमंत्री राष्ट्रीय पिक विमा योजनेअंतर्गत नुकसान भरपाई देण्याची तरतूद असतांना कंपनीने अद्यापही नुकसान भरपाई न देणे, शेतक-यांचे १०० टक्के नुकसान ग्राहय धरुन सरसकट नुकसान भरपाई देण्याचे व ज्या शेतक-यांनी पिक विमा भरला नाही त्यांनाही पिक विमा रक्कमेत ५० टक्के रक्कम नुकसान भरपाई म्हणून देण्याचे शासनाने आश्वासन देऊनही त्याची अंमलबजावणी न होणे, विमा कंपनीने ड्रोनद्वारे नियमबाहय पंचनामे करणे, NDRF अंतर्गत मदत मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष, परिणामी महसुल व कृषी विभागाने केलेल्या पंचनाम्याच्या आधारे सन २०१६ च्या खरीप हंगामातील पिक विमा नुकसान भरपाई व नैसगिक आपत्ती अंतर्गत मदत देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री. जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, सुरेश लाड, दिलीप वळसे-पाटील, अजित पवार, शशिकांत शिंदे, पांडुरंग बरोरा, वैभव पिचड, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. किसन कथोरे, संजय केळकर, संदीप नाईक, बळीराम सिरसकार, राणाजगजीतसिंह पाटील, दिपक चव्हाण, अब्दुल सत्तार, हसन मुश्रीफ, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. हनुमंत डोळस, दत्तात्रय भरणे, राहुल जगताप, राजेश टोपे, राहुल मोटे, राहुल कुल, बाळासाहेब पाटील, सुनिल शिंदे, ॲड. भीमराव धोंडे, श्री. संतोष दानवे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य विभागाने सन २०१६-२०१७ मध्ये केंद्रीय स्तरावर श्वान दंशावरील लसीची खरेदी न केल्यामुळे या लसीचा मोठया प्रमाणात तुटवडा निर्माण झाला असल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, राज्यात सुमारे अडीच लाख श्वानदंशाच्या घटना घडत असून त्यासाठी सुमारे १२ लाख वायलची खरेदी करण्यात येणे, शासनाकडून स्थानिक पातळीवर ही लस १३७ प्रतिवायल या दराने खरेदी करणे, भारत बायोटेक कंपनी हीच लस १२६ रुपये प्रतिवायल दराने उपलब्ध करुन देण्यास तयार असतांनासुध्दा ही लस त्या कंपनीकडून खरेदी करण्यात न येणे, त्यामुळे शासनाचे लाखो रुपयांचे होत असलेले नुकसान, परिणामी निविदा मागवून श्वानदंशावरील लसीची खरेदी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**आठ : शासकीय विधेयके :**

(**अ**) **पुर:स्थापनार्थ :-**

(१) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४९ - महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७.

(२) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७.

(**ब**) **विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री विजय वडेट्टीवार, अमिन पटेल, हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, सर्वश्री शशिकांत शिंदे, अजित पवार, भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड, संजय कदम, दिलीप वळसे-पाटील, हसन मुश्रीफ, अबु आजमी, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, सुरेश लाड, राहुल मोटे, दिपक चव्हाण, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, राजेश टोपे, पांडुरंग बरोरा, हनुमंत डोळस, वैभव पिचड, बाळासाहेब पाटील, जयंत पाटील, सुनील केदार, राणाजगजितसिंह पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."

(ख) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४१ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४१ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४१ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४१ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४१ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** (क) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४३ — महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४३ — महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४३ — महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४३ — महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४३ — महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ११ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या

आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३)** (क) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७ — महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापराचे रुपांतर व अकृषिक आकारणी) नियम (सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४७ — महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापराचे रुपांतर व अकृषिक आकारणी) नियम (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४७ — महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापराचे रुपांतर व अकृषिक आकारणी) नियम (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४७ — महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापराचे रुपांतर व अकृषिक आकारणी) नियम (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ११ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(क) विधानसभेने संमत केलेले विधेयके महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम**

**१४१(१) अन्वये पुन्हा संमत करणे :-**

(१) सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २ – मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७.

(२) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ – मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७.

(३) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० – भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७.

**नऊ : सर्वश्री अजित पवार, राधाकृष्ण विखे-पाटील, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, डॉ. पतंगराव कदम, शशिकांत शिंदे, विजय वडेट्टीवार, जितेंद्र आव्हाड, बाळासाहेब थोरात, अब्दुल सत्तार, भास्कर जाधव, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री हसन मुश्रीफ, सुनिल केदार, संदीप नाईक, गोपालदास अग्रवाल, मो.आरिफ नसीम खान, सुरेश लाड, अमित देशमुख, दिलीप सोपल, डि एस. अहिरे, राणाजगजितसिंह पाटील, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री बबनराव शिंदे, मधुकरराव चव्हाण, राहुल मोटे, डी.पी.सावंत, कालिदास कोळंबकर, शिवेंद्रसिंह भोसले, बसवराज पाटील, राजेश टोपे, वसंतराव चव्हाण, दत्तात्रय भरणे, अमिन पटेल, बाळासाहेब पाटील, के.सी.पाडवी, कुणाल पाटील, संग्राम जगताप, काशीराम पावरा, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री.हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, नितेश राणे, विजय भांबळे, वैभव पिचड, अमर काळे, पांडुरंग बरोरा, अमित झनक, रणजित कांबळे, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ संतोष टारफे, सर्वश्री शेख असिफ शेख रशिद, श्रीमती निर्मला गावीत, श्री.अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, त्र्यंबक भिसे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, जयकुमार गोरे, पंकज भुजबळ, प्रदिप जाधव-नाईक, दिपक चव्हाण, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यात मंत्रालयीन विभागामध्ये १२०० योजना कार्यरत असणे, केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनाने आर्थिक काटकसरीच्या नावाखाली व निती आयोगाने दोन वर्षापूर्वी केलेल्या शिफारशीनुसार केंद्र शासनाने राज्याला दिल्या जाणाऱ्या १०० टक्के अनुदानाच्या ६६ योजना कमी करुन त्या २८ वर आणणे, यावर्षी पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, गृह, उर्जा, कामगार व नगरविकास इत्यादी विभागाच्या ७६ योजना वगळण्यात येणे, राज्याच्या नियोजन विभागाने काही योजना बंद करणे अथवा त्यांचे एकत्रिकरण करून यादी तयार करणे, कृषी आणि उर्जा विभागाने योजना बंद करण्यात घेतलेला पुढाकार, राज्यातील शेतकऱ्यांना जाहीर केलेली कर्जमाफी व शासकीय कर्मचाऱ्यांना द्याव्या लागणाऱ्या सातव्या

वेतन आयोगाची वेतनश्रेणी या पार्श्वभुमीवर राज्याच्या महसुलात घट होणार असल्याने शासकीय खर्चात ३० टक्के कपात करुन शासनाने एकप्रकारे काटकसरीची आणीबाणी जाहीर केल्याने राज्याच्या विकास कामांना/योजनांना बसलेली खीळ, अर्थसंकल्पात केलेली विकासनिधीची ५० टक्के रक्कमदेखील मार्चअखेर खर्च न झाल्याची बाब निदर्शनास येणे, परिणामी राज्य प्रगतीपथावर जाण्याऐवजी अधोगतीकडे वाटचाल करीत असल्याची निर्माण झालेली भिती, विविध विभागाच्या योजना बंद करण्याचा शासनाने लावलेला सपाटा, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झालेला असंतोष, शासनाने याप्रकरणी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**दहा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या व प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (सूचना क्र. १ व २)**

(१) **श्री.नरेंद्र पवार, वि.स.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रातील आधारवाडी येथील कचरा क्षेपणभूमीची क्षमता संपल्याने ती शास्त्रोक्त पध्दतीने बंद करण्याचे आदेश दोन वर्षापूर्वी मा. उच्च न्यायालयाने देऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही न होणे, सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेंतर्गत तब्बल ४४ कोटी रुपयांचे अनुदान देऊन त्यामध्ये महानगरपालिकेने अर्धा हिस्सा भरुन सुमारे १७ कोटी रुपये खर्च करुन कचरा संकलन व वाहतुकीसाठी १२५ वाहने खरेदी करणे, तसेच उंबर्डे येथील २७ कोटी रुपये खर्च करुनही कचरा विघटन प्रकल्प सुरु करण्यात न आल्याने खर्च वाया जाणे, महापालिकेने उंबर्डे येथे पुन्हा हाच प्रकल्प राबविण्यासाठी ६० कोटी रुपयांच्या विकास आराखडयास सर्वसाधारण सभेने मंजुरी देऊन शासनाकडे पाठविणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **डॉ.देवराव होळी, वि.स.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"गडचिरोली जिल्ह्यात मामा तलावांची संख्या मोठया प्रमाणावर असणे, जिल्ह्यात पावसाचे प्रमाण देखील मोठया प्रमाणावर असणे, मात्र या पाण्याचा व तलावांचा शेती व सिंचनाकरिता बारमाही उपयोग होत नसल्याचे निदर्शनास येणे, शेतकऱ्यांच्या हितासाठी व जिल्ह्याच्या विकासासाठी छत्तीसगडच्या धर्तीवर मामा तलावांमध्ये बारमाही पाण्याची सोय करण्याची आवश्यकता, मामा तलावांचे खोलीकरण, गावांतील नाल्यांचे पाणी तलावांमध्ये सोडणे यासारखी कामे झाल्यास सिंचन क्षमता वाढण्यास मदत मिळणे आवश्यक असणे, शासनाने या सर्व मामा तलावांवर बारमाही पाण्याची सोय उपलब्ध

करून देण्यासंदर्भात तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २ ऑगस्ट, २०१७.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.